# पहिल्या बोगद्याची मोहीम फत्ते

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

**मेट्रो-३चा पाली मैदान-विमानतळ बोगदा पूर्ण**

**खोदकाम पूर्ण करून वैनगंगा-१ मशीन जमिनीतून बाहेर**

**तीन वर्षांत मुंबईचा चेहरामोहरा बदलेल, मुख्यमंत्र्यांना विश्वास**


शैलेश जाधव

अनेक अडचणींचा सामना करत मेट्रो-३ ने गाठलेला टप्पा कौतुकास्पद आहे. मुंबईत ज्या पद्धतीने मेट्रोच्या विविध प्रकल्पांची कामे प्रगतिपथावर आहेत, ते पाहता येत्या तीन वर्षांत मुंबईत मेट्रोचे जाळे निर्माण होऊन या शहराचा चेहरामोहरा बदलून जाईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ प्रकल्पातील पाली मैदान ते आंतरराष्ट्रीय विमानतळ येथपर्यंत पहिला बोगदा खोदण्याचे काम पूर्ण झाले. बोगदा खणून पहिले मशीन सोमवारी भूगर्भातून बाहेर पडले. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते.

'आतापर्यंत मुंबईचे शांघाय बनवण्याचे स्वप्न पाहिले जात होते. परंतु आता ती गरज नाही. मुंबई ही मुंबईच राहिली पाहिजे, असेच आमचे मत असून त्यादृष्टीने कामे सुरू आहेत. भविष्यात बदलेल्या मुंबईचे रूपडे पाहायला शांघायचे लोक मुंबईत येतील. मेट्रोसह शिवडी-न्हावा शेवा ट्रान्स हार्बर लिंक, वांद्रे वर्सोवा सीलिंक यांसारख्या प्रकल्पांमुळे २१ शतकात मुंबई हे देशातील सर्वात उल्लेखनीय शहर असेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सर्वच प्रकारच्या सार्वजनिक वाहतुकीसाठी एकच तिकिट असावे, यासाठी एमएमआरडीए एक प्रणाली विकसित करीत आहे. मुंबईत आलेल्या निती आयोगाच्या शिष्टमंडळाने या प्रणालीची माहिती घेतली, त्यांना ती भावली, त्यामुळे भविष्यात हीच प्रणाली देशपातळीवर वापरली जाईल, असे त्यांनी सांगितले. 'या प्रकल्पात अनेक अडचणी आल्या, परंतु मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी प्रचंड मेहनत घेत सहकाऱ्यांच्या मदतीने या अडचणींवर मात केली,'· या शब्दांत मुख्यमंत्र्यांनी भिडे यांचे कौतुक केले.

## एकच जल्लोष

बरोबर पाच वाजून ३९ मिनिटांनी दगडी भिंतीला आतून यंत्राने धडक दिली. भिंतीला कापत भींती एक एक चिरा ढासळू लागला. काही क्षणातच धाडकन भिंत आडवी झाली आणि भुयार खोदणारे पहिले यंत्र बोगद्यातून बाहेर पडले. यंत्राच्या आतील तंत्रज्ञांनी आतून तिरंगा झेंडा फडकावला आणि एकच जल्लोष झाला.

## भुयारणीकरणाचे वैशिष्ट्य

- पाली मैदान ते आंतरराष्ट्रीय विमानतळ १.२६ किमी भुयारीकरण २५९ दिवसांत पूर्ण
- २५० निष्णात इंजिनीअर,तंत्रज्ञ व कुशल कामगार सहभागी
- वैनगंगा-१ यंत्र शांघाय टनेलिंग इंजिनीअरिंग कंपनीने तयार केले असून यंत्राची लांबी ९२मीटर आहे, हे यंत्र रोज ४.६ मिटरचे खोदकाम करते.
- आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनल-२ ते आरे कॉलनीचा रॅम्प या दरम्यान ४.१५७ किमी लांबीच्या टप्प्यात तीन यंत्रे ७.७ किमीचे भुयारीकण करणार आहेत.